# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. २१०/२०२०**

**विषय : कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव कमी करणेकामी प्रतिबंधात्मक उपाययोजना..**

**संदर्भ :** १. पुणे महानगरपालिका आयुक्त कार्यालय जा.क्र.मआ/साप्रवि/२३६१ दिनांक १२ जुलै, २०२०
२. पिंपरी चिंचवड महानगरपालिका जा.क्र.वैद्य/९/४०६६/२०२० दिनांक १२ जुलै, २०२०

कृपया वरील संदर्भीय आदेश/पत्राचे अवलोकन करावे.

उपरोक्त संदर्भीय आदेशान्वये पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त कार्यालयाने पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत कोव्हीड-१९ विषाणूचा परिरोध (प्रतिबंध) करण्यासाठी दिनांक १४ जुलै, २०२० चे पहाटे ०१.०० वाजेपासून ते दिनांक २३ जुलै, २०२० रोजीचे रात्री १२.०० पर्यंत संपूर्ण टाळेबंदी (Lockdown) लागू केलेली असून सर्व शैक्षणिक संस्था बंद ठेवण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार खालील आदेश निर्गमित करण्यात येत आहेत :

१) विद्यापीठातील सर्व शैक्षणिक/प्रशासकीय विभाग तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीच्या कार्यक्षेत्रातील विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था दिनांक १४ जुलै, २०२० ते दिनांक २३ जुलै, २०२० या कालावधीत बंद राहतील.

२) त्याअनुषंगाने शिक्षक व शिक्षकेतर सेवकांनी सदर कालावधीत मुख्यालय न सोडता घरी राहून (Work From Home) संबंधित कामकाज पहावे. त्याचप्रमाणे कोणत्याही अत्यावश्यक कार्यालयीन कामकाजाकरिता वरिष्ठांनी संबंधितास कार्यालयात बोलविल्यास त्यांना कार्यालयामध्ये त्वरीत उपस्थित राहणे अनिवार्य राहील, याची सर्वांनी नोंद घ्यावी. या कालावधीत शिक्षक व शिक्षकेतर सेवकांनी पूर्वपरवानगीशिवाय त्यांचे मुख्यालय सोडू नये.

३) सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांनी "आरोग्य सेतू" अॅप वापरणे आवश्यक आहे.

४) विद्यापीठ आवारातील अत्यावश्यक सेवा प्रदान करणारी कार्यालये आवश्यकतेनुसार पूर्ण क्षमतेने कार्यरत राहतील.

यासंदर्भात शासनाचे अथवा सक्षम प्राधिकरणाचे काही वेगळे आदेश प्राप्त झाल्यास त्यासंदर्भात स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

संदर्भीय आदेशामधील नमूद मार्गदर्शक सूचनांचे तसेच दक्षतेच्या उपाययोजनांचे सर्व संबंधितांनी तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे.

**सोबत :**

१. पुणे महानगरपालिका आयुक्त कार्यालय जा.क्र.मआ/साप्रवि/२३६१ दिनांक १२ जुलै, २०२०
२. पिंपरी चिंचवड महानगरपालिका जा.क्र.वैद्य/९/४०६६/२०२० दिनांक १२ जुलै, २०२०

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जावक क्र. एएन/२३१३
दिनांक : १३/०७/२०२०

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. सर्व शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग
३. मा.प्राचार्य, विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालये
४. मा.संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था

} आपणास विनंती की, सदर परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.